MHWS080007482019

<u>**रे.मु.नं. ६४/२०१९ मधील नि. ६५ वरील आदेश**</u>

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०१—अ(१) चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे अर्जातील कथनानुसार, यातील प्रतिवादी क्र.०१—अ(१) लक्ष्मी मिलींद तुरुकमाने या दिनांक १३.०७.२०२५ रोजी हराळ ता. रिसोड येथे मयत झालेल्या आहेत. त्यांना मुलगा राहूल हा वारस असून वादी हे पुणे येथे राहत असल्याने ते खाजगी कामांमध्ये व्यस्त होते. त्यामुळे त्यांना प्रतिवादी मयत झाल्याची माहिती वेळेत प्राप्त झाली नाही. वादींनी सदर मयताची माहिती प्राप्त झाल्यानंतर ताबडतोब प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला असून अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला नाही. मात्र न्यायालय विलंब झाल्याचे निष्कर्षाप्रत आल्यास औपचारिकता राहू नये याकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला असून अर्ज मंजूर करुन मयत प्रतिवादीचे वारसांना रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ व्हावा अशी विनंती केली.

**३.** सदर अर्जावर प्रतिवादी तर्फे म्हणणे दाखल केले. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादीने जाणीवपूर्वक दावा लांबणीवर टाकण्याच्या हेतूने अर्ज दिला असून वादीने यापूर्वी देखील पुरावा देण्याकरीता बराचसा कालावधी घेतलेला आहे. त्यामुळे वादींचा अर्ज र.रु. ५०० इतका दंड आकारुन नामंजूर करावा अशी विनंती केली.

**४.** दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुतचा दावा वाटणी व स्वतंत्र ताबा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीत, वादीने दिलेला अर्ज

व त्याबाबत कायदेशीर बाब पाहता, दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २२ नियम ०४ प्रमाणे मयत प्रतिवादी क्र.०१—अ(१) चे वारस सदर व्यक्ती मयत झाल्यापासून ९० दिवसांचे आत अर्ज सादर करुन अभिलेखावर घेणे आवश्यक असते. वादीने सदरचा अर्ज दि. ०६.१२.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी क्र.०१—अ(१) हे दिनांक १३.०७.२०२५ रोजी मयत होउन देखील वादी पुणे येथे राहत असल्याने त्यांना मयताबाबतची माहिती उशिराने मिळाल्याचे कारण नमूद केलेले आहे. मात्र सदरचे कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही.

५. मयत प्रतिवादी क्र.०१—अ(१) यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र.६४ चे कागदयादी सोबत अनुक्रमांक ०२ वर दाखल केलेला आहे. वादींना मयत प्रतिवादी क्र.०१—अ(१) यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास सुमारे दिड महिन्यापेक्षा जास्त कालावधीचा विलंब झाल्याचे दिसून येते. परंतु दाव्याचे स्वरुप पाहता सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्याय हक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही. उलटपक्षी, उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. सबब, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन, मयत प्रतिवादी क्र.०१—अ(१) चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेल्या विलंबाबाबत ठरावीक दंड आकारून अर्ज मंजुर करणे आवश्यक असलेच्या निष्कर्षाप्रत येवुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

वादीने दिलेला प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.६५ प्रतिवादी यांना एकूण दंड र.रू. २००/— देण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2026.01.02 17:53:59 +0530

(पी. व्ही. सपकाळ)

दिनांक — ०२/०१/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

**<u>रे.मु.नं. ६४/२०२५ मधील नि.६६ वरील आदेश</u>**

**१.** प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ०४ प्रमाणे मयत प्रतिवादी क्र.०१—अ(१) लक्ष्मी मिलींद तुरुकमाने व दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ०३ सह आदेश ६ नियम १७ प्रमाणे मयत वादी क्र.०१ करुणा माधव तुरुकमाने यांचे नाव दावे अर्जातून कमी करुन त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीच्या अर्जातील कथानानुसार, वादी क्र.०१ करुणा माधव तुरुकमाने या दिनांक ३०.०९.२०२५ रोजी पुणे येथे तर प्रतिवादी क्र. ०१—अ(१) लक्ष्मी मिलींद तुरुकमाने या दिनांक १३.०७.२०२५ रोजी हराळ ता. रिसोड येथे मयत झालेल्या आहेत. वादी क्र.०१ यांना अमित माधव तुरुकमाने व अभिषेक माधव तुरुकमाने हे वारस असून प्रतिवादी क्र. ०१—अ(१) यांना राहूल मिलींद तुरुकमाने हे कायदेशीर वारस आहेत. सदरचे वादी क्र.०१ व प्रतिवादी क्र.०१—अ(१) यांचे वर नमूद वारस हे दाव्याचे कामी यापूर्वीच पक्षकार म्हणून समाविष्ट आहेत. त्यांचेव्यतिरिक्त मयतांना इतर वारस नाहीत. त्यामुळे मूळ दाव्याचे कामी मयत वादी क्र.०१ व प्रतिवादी क्र.०१—अ(१) यांचे नाव कमी होउन आवश्यक ती दुरुस्ती करण्यास परवानगी दयावी अशी विनंती केली.

**३.** सदर अर्जावर प्रतिवादी तर्फे म्हणणे मागवणेत आले असता प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन अर्जास सक्त विरोध असल्याचे नमूद केले.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा हा वाटप व स्वतंत्र कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. परंतु दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना वादी क्र.०१ करुणा माधव तुरुकमाने व प्रतिवादी क्र.०१—अ(१) लक्ष्मी मिलींद तुरुकमाने हे दोन्ही पक्षकार अनुक्रमे दिनांक ३०.०९.२०२५ व १३.०७.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादी क्र.०१ ने सदरचा अर्ज दि. ०६.१२.२०२५ रोजी दाखल केलेला दिसतो. परंतु असे जरी असले तरी, वादींना मयत प्रतिवादी क्र.०१—अ(१) बाबतची माहिती उशिराने झाल्याने वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झाल्याचे दिसून येते.

५. मयत वादी क्र.०१ व मयत प्रतिवादी क्र.०१—अ(१) यांचे मृत्युचे दाखले कागदयादी नि. क्र.६४ सोबत अनुक्रमांक ०१ व ०२ वर दाखल केलेले आहेत. सबब, अशा परिस्थितीत मयत वादी क्र.०१ व प्रतिवादी क्र.०१—अ(१) यांचे कायदेशीर वारसांना दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ०३ व ०४ प्रमाणे दावा चालविण्याचा अधिकार टिकून रहात असल्याने मयत वादी क्र.०१ व प्रतिवादी क्र.०१—अ(१) यांचे नाव दावे अर्जातून कमी करुन त्यांच्या कायदेशीर वारसांना सामील करुन त्याप्रमाणे दुरुस्ती दावे अर्जात करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत सदर दुरूस्ती अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्यायहक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही अथवा दाव्याचे मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. उलटपक्षी, उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा सदरचा अर्ज निशाणी ६६ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर अर्जाप्रमाणे १४ दिवसांचे आत अथवा पुढील तारखेपर्यंत दावे अर्जात मयत वादी क्र.०१ व प्रतिवादी क्र.०१—अ(१) चे नाव कमी करण्याबाबत तसेच वारसांबाबत आवश्यक ती दुरूस्ती करावी व दावा दुरुस्ती प्रत याकामी सादर करावी.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2026.01.02 17:54:08 +0530

(पी. व्ही. सपकाळ)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
रिसोड

दिनांक — ०२/०१/२०२६

## शेरा

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | हर्षाली अ. उचाडे |
| निकाल तारीख | : | ०२.०१.२०२६ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | ०२.०१.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | ०२.०१.२०२६ |